# राज्यातील हवामान, रब्बी व उन्हाळी हंगाम २०२०-२१ पिक पेरणी व पिक परिस्थितीचा दिनांक १५/०३/२०२१ अखेरचा साप्ताहिक अहवाल

**हवामान व पर्जन्यमान** : राज्यात अहवाल कालावधीत बहुतांश विभागात आकाश निरभ्र व हवामान कोरडे होते. तापमानात वाढ झाली आहे. नागपूर विभागात तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

दि.२६.०२.२०२१ रोजीच्या प्राथमिक अहवालानुसार २६ फेब्रुवारी-२०२१ अखेर नैसर्गिक आपत्तीमुळे २१ जिल्हयात ६०४१६ हेक्टर क्षेत्र बाधित असून, यामध्ये प्रामुख्याने गहू, हरभरा, मका, द्राक्ष, भाजीपाला, डाळींब, संत्रा, लिंबू, केळी, कांदा, पपई इत्यादी पिकांचा समावेश आहे.

**रब्बी हंगाम-२०२०-२१**

राज्यात रब्बी पिकांखालील सरासरी क्षेत्र ५१.२० लाख हेक्टर असून दि.१५ मार्च, २०२१ अखेर ६०.४३ लाख हेक्टर क्षेत्रावर (११८.०४%) पेरणी झाली आहे. गहू पिक दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढणीची कामे सुरु झाली आहेत. रब्बी ज्वारी पिक पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणीची कामे सुरु आहेत. हरभरा पिक घाटे पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणीची कामे सुरु आहेत. सुर्यफुल व करडई पिके दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहेत. मका पिक कणसे लागणे, दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणीची कामे सुरु झाली आहेत.

**उन्हाळी हंगाम-२०२०-२१**

राज्यात उन्हाळी पिकांखालील सरासरी क्षेत्र १.८१ लाख हेक्टर असून दि.१५ मार्च, २०२१ अखेर १.६४ लाख हेक्टर क्षेत्रावर (९१%) पेरणी झाली आहे. उन्हाळी भात लागवडीची व उन्हाळी मका, भुईमूग पेरणीची कामे सुरु झाली आहेत. पेरणी झालेली पिके उगवण, रोप ते वाढीच्या अवस्थेत आहेत.

**रब्बी हंगाम सन-२०२०-२१ मधील राज्यस्तरिय पेरणी क्षेत्र (लाख हे.) व टक्केवारी** (दि.१५ मार्च, २०२१ **अखेर**)



## रब्बी हंगाम सन-२०२०-२१ मधील पेरणी क्षेत्राचा सरासरी पेरणी क्षेत्राशी तुलनात्मक तक्ता (दि.१५ मार्च, २०२१ अखेर)




## रब्बी हंगाम सन-२०२०-२१ मधील विभागनिहाय पेरणी क्षेत्राचा तुलनात्मक तक्ता (क्षेत्र लाख हे.) (दि.१५ मार्च, २०२१ अखेर)



# विभागनिहाय पिक परिस्थिती

## कोकण विभाग

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश निरभ्र होते. हवामान कोरडे व तापमानात वाढ झाली आहे.

**रब्बी हंगाम-२०२०-२१**

विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ०.३४ लाख हेक्टर असून, दि.१५ मार्च, २०२१ अखेर ०.३५ लाख हेक्टर क्षेत्रावर (१०३.२२%) पेरणी झाली आहे. विभागात हरभरा, वाल, चवळी, कुळीथ पिके पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणीची कामे सुरु आहेत. इतर गळीतधान्य पिके शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून, पक्व झालेली पिके काढणीस सुरुवात झाली आहे.

**उन्हाळी हंगाम-२०२०-२१**

विभागात उन्हाळी पिकाखालील सरासरी क्षेत्र ०.०९ लाख हेक्टर असून, दि.१५ मार्च, २०२१ अखेर ०.०५ लाख हेक्टर क्षेत्रावर (४९%) पेरणी झाली आहे. विभागात उन्हाळी भात लागवडीची कामे पुर्ण झाली आहेत. लागवड झालेली भात पिके फुटवे फुटणे ते निसवणेच्या अवस्थेत आहे. उन्हाळी भुईमूग पिक वाढीच्या ते आऱ्या सुटणेच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग -** निरंक

## नाशिक विभाग

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश निरभ्र होते. हवामान कोरडे व तापमानात वाढ झाली आहे.

**रब्बी हंगाम-२०२०-२१**

विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ४.६७ लाख हेक्टर असून दि.१५ मार्च, २०२१ अखेर ५.७६ लाख हेक्टर क्षेत्रावर (१२३.५१%) पेरणी झाली आहे. विभागात रब्बी ज्वारी पिक पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत आहे. गहू पिक पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत आहे. हरभरा पिक काढणीची कामे सुरु आहेत. मका पिक कणसांमध्ये दाणे भरणेच्या ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. सुर्यफुल, मोहरी व करडई पिके दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. अडसाली, सुरु व पुर्वहंगामी ऊस वाढीच्या अवस्थेत आहे.

**उन्हाळी हंगाम-२०२०-२१**

विभागात उन्हाळी पिकाखालील सरासरी क्षेत्र ०.२७ लाख हेक्टर असून, दि.१५ मार्च, २०२१ अखेर ०.२७ लाख हेक्टर क्षेत्रावर (९९%) पेरणी झाली आहे. विभागात उन्हाळी भुईमूग, मका, सुर्यफुल, बाजरी व तीळ पिकांच्या पेरणीची कामे सुरु आहेत.

**किड व रोग -निरंक**

## पुणे विभाग

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश निरभ्र होते. हवामान कोरडे व तापमानात वाढ झाली आहे.

**रब्बी हंगाम-२०२०-२१**

विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र १४.४९ लाख हेक्टर असून दि.१५ मार्च, २०२१ अखेर ११.२८ लाख हेक्टर क्षेत्रावर (७७.८८%) पेरणी झाली आहे. विभागात ज्वारी पिकाच्या काढणीची कामे अंतिम टप्प्यात

आहेत. गहू पिक पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत आहे. मका पिक कणसांमध्ये दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत तर काही ठिकाणी काढणी सुरु झाली आहे. करडई, सुर्यफुल पिकांच्या काढणीची कामे सरु आहेत. हरभरा पिक काढणीच्या अवस्थेत आहे.

**उन्हाळी हंगाम-२०२०-२१**

विभागात उन्हाळी पिकाखालील सरासरी क्षेत्र ०.१९ लाख हेक्टर असून, दि.१५ मार्च, २०२१ अखेर ०.१४ लाख हेक्टर क्षेत्रावर (७२%) पेरणी झाली आहे. विभागात उन्हाळी हंगामाच्या पुर्वमशागतीची कामे सुरु आहेत. भुईमूग व मका पिकाच्या पेरणीस सुरुवात झाली आहे.

**किड व रोग - निरंक**

## कोल्हापूर विभाग

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश निरभ्र होते. हवामान कोरडे व तापमानात वाढ झाली आहे.

**रब्बी हंगाम-२०२०-२१**

विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ४.५९ लाख हेक्टर असून दि.१५ मार्च, २०२१ अखेर ४.३८ लाख हेक्टर क्षेत्रावर (९५.४५%) पेरणी झाली आहे. विभागात गहू पिक दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढण्या सुरु झाल्या आहेत. ज्वारी पिक दाणे पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणीची कामे जोराने सुरु आहेत. मका पिक दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणीची कामे सुरु आहेत. हरभरा पिक काढणीची कामे सुरु आहेत. पुर्व हंगामी ऊस वाढीच्या अवस्थेत, आडसाली ऊस जोमदार वाढीच्या अवस्थेत, सुरु ऊस फुटवे फुटणे ते वाढीच्या अवस्थेत आहे.

**उन्हाळी हंगाम-२०२०-२१**

विभागात उन्हाळी पिकाखालील सरासरी क्षेत्र ०.११ लाख हेक्टर असून, दि.१५ मार्च, २०२१ अखेर ०.०९ लाख हेक्टर क्षेत्रावर (८१%) पेरणी झाली आहे. विभागात भात, मका व उन्हाळी भुईमूग पेरणीची कामे अंतिम टप्प्यात असून, पेरणी झालेली पिके वाढीच्या अवस्थेत आहेत.

**किड व रोग -निरंक**

## औरंगाबाद विभाग

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश निरभ्र होते. हवामान कोरडे व तापमानात वाढ झाली आहे.

**रब्बी हंगाम-२०२०-२१**

विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ६.०५ लाख हेक्टर असून, दि.१५ मार्च, २०२१ अखेर ९.६७ लाख हेक्टर क्षेत्रावर (१५९.९५%) पेरणी झाली आहे. विभागात गहू पिक दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. मका पिक कणसे लागणे ते कणसांमध्ये दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. रब्बी ज्वारी पिक पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढणी सुरु झाली आहे. हरभरा पिक काढणीची कामे सुरु आहेत.

**उन्हाळी हंगाम-२०२०-२१**

विभागात उन्हाळी पिकाखालील सरासरी क्षेत्र ०.०६ लाख हेक्टर असून, दि.१५ मार्च, २०२१ अखेर ०.१२ लाख हेक्टर क्षेत्रावर (२१०%) पेरणी झाली आहे. विभागात बाजरी व भुईमूग पिके रोप ते वाढीच्या अवस्थेत आहेत. पिक परिस्थिती समाधानकारक आहे.

**किड व रोग -निरंक**

## लातूर विभाग

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश निरभ्र होते. हवामान कोरडे व तापमानात वाढ झाली आहे.

**रब्बी हंगाम-२०२०-२१**

विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र १०.८७ लाख हेक्टर असून, दि.१५ मार्च, २०२१ अखेर १५.२७ लाख हेक्टर क्षेत्रावर (१४०.५०%) पेरणी झाली आहे. विभागात रब्बी ज्वारी पिक पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत आहे. गहू पिक पक्वतेच्या अवस्थेत आहे. मका पिक कणसांमध्ये दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. हरभरा पिक घाटे पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत आहे. करडई पिक बोंडे पक्वतेच्या अवस्थेत आहे.

**उन्हाळी हंगाम-२०२०-२१**

विभागात उन्हाळी पिकाखालील सरासरी क्षेत्र ०.३० लाख हेक्टर असून, दि.१५ मार्च, २०२१ अखेर ०.००२ लाख हेक्टर क्षेत्रावर (१%) पेरणी झाली आहे. उन्हाळी पिकांच्या पेरणीची कामे सुरु आहेत. पेरणी झालेली पिके वाढीच्या अवस्थेत आहेत.

**किड व रोग -निरंक**

## अमरावती विभाग

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश निरभ्र होते. हवामान कोरडे व तापमानात वाढ झाली आहे.

**रब्बी हंगाम-२०२०-२१**

विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ६.४६ लाख हेक्टर असून, दि.१५ मार्च, २०२१ अखेर ८.७५ लाख हेक्टर क्षेत्रावर (१३५.३६%) पेरणी झाली आहे. विभागात गहू पिक पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणी सुरु आहे. हरभरा पिक पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणी व मळणीची कामे सुरु आहेत. पिक परिस्थिती समाधानकारक आहे.

**उन्हाळी हंगाम-२०२०-२१**

विभागात उन्हाळी पिकाखालील सरासरी क्षेत्र ०.३० लाख हेक्टर असून, दि.१५ मार्च, २०२१ अखेर ०.१८ लाख हेक्टर क्षेत्रावर (६१%) पेरणी झाली आहे. उन्हाळी पिकांच्या पेरणीची कामे सुरु आहेत. पेरणी झालेली पिके वाढीच्या अवस्थेत आहेत.

**किड व रोग - निरंक**

## नागपूर विभाग

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**रब्बी हंगाम-२०२०-२१**

विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ३.७४ लाख हेक्टर असून, दि.१५ मार्च, २०२१ अखेर ४.९७ लाख हेक्टर क्षेत्रावर (१३२.८५%) पेरणी झाली आहे. विभागात हरभरा पिक पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणी प्रगतीत आहे. गहू पिक दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. मका पिक कणसांमध्ये दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. ज्वारी पिक पक्वतेच्या अवस्थेत आहे.

**उन्हाळी हंगाम-२०२०-२१**

विभागात उन्हाळी पिकाखालील सरासरी क्षेत्र ०.४७ लाख हेक्टर असून, दि.१५ मार्च, २०२१ अखेर ०.७८ लाख हेक्टर क्षेत्रावर (१६६%) पेरणी झाली आहे. विभागात उन्हाळी भात वाढ ते फुटवे फुटण्याच्या अवस्थेत आहे. भुईमूग पिक वाढीच्या ते आऱ्या धरणेच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग - निरंक**

**महाराष्ट्र राज्यातील रब्बी हंगाम २०२०-२१ मधील मुख्य पिकाखालील दि.१५.०३.२०२१ अखेरचा अंतिम पिक पेरणी अहवाल.**

(क्षेत्र हेक्टर मध्ये)

| अ.क्र. | पिके | सरासरी क्षेत्र (२०१४-१५ ते २०१८-१९) | मागिल वर्षाची पेरणी दि.१३/०३/२०२० | प्रत्यक्ष पेरलेले क्षेत्र | पेरलेल्या क्षेत्राची सरासरी क्षेत्राशी टक्केवारी | पेरलेल्या क्षेत्राची मागिल वर्षाशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रब्बी ज्वारी | २०२७२५८ | १९०५६९४ | १६६०१४४ | ८१.८९ | ८७.११ |
| २ | गहू | ८७५६३३ | १२४४२७५ | १३०६२३५ | १४९.१८ | १०४.९८ |
| ३ | मका | २६३८९६ | ३००५६४ | २९६७५६ | ११२.४५ | ९८.७३ |
| ४ | इतर रब्बी. तृणधान्ये | १४९२१ | १०९४६ | १४००८ | ९३.८८ | १२७.९७ |
| | **एकूण रब्बी. तृणधान्ये** | **३१८१७०८** | **३४६१४८०** | **३२७७१४३** | **१०३.००** | **९४.६७** |
| ५ | हरभरा | १७४३२५९ | २३१०८१२ | २५९४३३८ | १४८.८२ | ११२.२७ |
| ६ | इतर रब्बी. कडधान्ये | १०५७०४ | १३१५९९ | १२४१२४ | ११७.४३ | ९४.३२ |
| | **एकूण रब्बी कडधान्ये** | **१८४८९६३** | **२४४२४११** | **२७१८४६३** | **१४७.०३** | **१११.३०** |
| | **एकूण रब्बी अन्नधान्ये** | **५०३०६७२** | **५९०३८९०** | **५९९५६०५** | **११९.१८** | **१०१.५५** |
| ७ | करडई | ४६४६५ | १९०८८ | २०६०५ | ४४.३४ | १०७.९४ |
| ८ | जवस | १६६६९ | ८६८९ | ७२३० | ४३.३७ | ८३.२१ |
| ९ | तीळ | १६३० | ६१४ | १३२२ | ८१.०८ | २१५.४३ |
| १० | सुर्यफुल | १४४१६ | २७८२ | ३८१० | २६.४३ | १३६.९७ |
| ११ | इतर रब्बी तेलबीया | १००४५ | १०७५१ | १४७३६ | १४६.६९ | १३७.०६ |
| | **एकूण रब्बी तेलबीया** | **८९२२७** | **४१९२४** | **४७७०२** | **५३.४६** | **११३.७८** |
| | **राज्यातील एकूण पीकाखालील पेरणीचे क्षेत्र** | **५११९८९८** | **५९४५८१४** | **६०४३३०८** | **११८.०४** | **१०१.६४** |

टिप - पेरणी क्षेत्र नजर अंदाजित